ड" ३ फेब्रुवारीला साहित्य संमेलनात प्रकाशित होणारे आधुनिक डिजिटल उपकरणे हे पुस्तक ज्यांची आधुनिक तंत्राज्ञानाशी फारशी जवळीक नाही परंतु हया तंत्रज्ञानानी बनलेल्या अनेक साधनांचा किंवा उपकरणांचा दैनंदिन उपयोगा शिवाय गत्यंतर नाही अश्या अनेक लोकांसाठी एक उपयुक्त असा संदर्भ आहे. आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक जीवानात हया उपकरणांशिवाय माणुस एक समृध्द असे जीवन जगूच शकणारा नाही असे म्हटले तर ती अतिशोयोक्ती होऊ

नये. हया साधनांची सखोल माहिती असणे हे सुद्धा त्यांची पुरेपूर उपयुक्तता करून घेण्य करता खूप जरूरी आहे. शिकारपुरांचे हे पुस्तक त्या दृष्टीने खुपच उपयुक्त आहे. अत्यंत सोप्या साध्या भाषेत शिकारपूर आपल्याला माहिती ,संवाद, ह्या प्रचंड वेगाने विकसित झालेल्या आणि होत असललेल्या तंत्रज्ञानाची नुसती ओळख करून देत नाहीत तर अगदी आजच्या विकसित टप्पा पर्यंत आणून पोहचवतात. एक अत्यंत रंजक , उपयुक्त व संग्रही ठेवावे असेच हे पुस्तक आहे.

अनंत सरदेशमुख

कार्यकारी महासंचालक

मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज